ARTHA, Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २७ | पुणें, बुधवार तारीख ३ मे, १९६१ | अंक ९

## विविध माहिती

**उसाच्या वाढत्या उत्पादनाचा धोका**—उत्तर प्रदेशांत उसाचें उत्पादन एकसारखें वाढत चालल्यानें मध्यवर्ती सरकार व राज्य सरकार ह्यांच्यापुढें एक अवघड प्रश्न निर्माण झाला आहे, असें मत उत्तर प्रदेश सरकारच्या मुख्य मंत्र्यांनीं व्यक्त केलें आहे. उसाच्या शेतकऱ्यांनीं ह्या गोष्टीचा विचार करून उसाची लागवड कमी करावी असा सल्लाहि त्यांनीं दिला आहे. उसाच्या अमाप पिकामुळें उत्तर प्रदेशांतील साखरेचे कारखाने जुलै महिन्यापर्यंत चालतील असा त्यांचा अंदाज आहे.

**पाकिस्तानच्या योजनेचा खर्च वाढला**—पाकिस्तावच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या खर्चांत २१ टक्क्यांनीं वाढ झाल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे. प्रथम कार्यक्रमासाठी १,९०० कोटी रुपये खर्च करण्यांत येणार होते. परंतु आतां २,३०० कोटी रुपये खर्चाचा अंदाज करण्यांत आला आहे. परदेशचीं सरकारें व द्रव्यविषयक संस्था ह्यांच्याकडून पाकिस्तानला वाढती मदत मिळणार आहे.

**कच्छमध्यें यांत्रिक शेती**—कच्छ व राजस्थानमध्यें एक एक मोठें यांत्रिक शेत स्थापन करण्याची शिफारस भारत सरकारच्या शेतकी खात्यानें नेमलेल्या दामले कमिटीनें केली आहे. राजस्थानमध्यें नव्यानें स्थापन करण्यांत यावयाच्या ह्या शेताची जागा सुरगढपासून जवळच आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत अशा प्रकारच्या यांत्रिक शेतांसाठी २ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

**सिकिममधील रस्त्यांची वाढ**—सिकिमच्या सरकारनें आर्थिक विकासाचा सप्तवार्षिक कार्यक्रम आंखला आहे. ह्या कार्यक्रमासाठी एकूण ३४० लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. कार्यक्रमांत रस्ते व दळणवळणाचीं साधनें ह्यांवर विशेष भर देण्यांत आला आहे. ह्या कामासाठी एकूण खर्चापैकी १७० लाख रुपये खर्च व्हावयाचे आहेत. संकल्पित नव्या रस्त्यांपैकी बरेच तयार होत आले आहेत.

**ग्रामीण विद्यापीठ**—कोइमतूर येथील शेतकी कॉलेजचा फायदा घेऊन त्या ठिकाणीं एक ग्रामीण विद्यापीठ स्थापन करण्याचें घाटत आहे. मद्रास सरकारनें ह्यासंबंधीं नेमलेल्या कमिटीनें अशी शिफारस केली आहे कीं, संकल्पित विद्यापीठाकडे मद्रास राज्यांतील सर्व शेतकी-विषयक संशोधनाला मार्गदर्शन करण्याचें काम सोंपविण्यांत यावें. भारतामधील चार किंवा पांच ग्रामीण विद्यापीठांपैकीं तें एक होईल.

**गरिबांना कायद्याची मोफत मदत**— भारताचे मुख्य न्यायाधीश श्री. सिन्हा ह्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, गरिबांना कोर्टांच्या कामकाजांत मोफत मदत करण्याच्या एका योजनेचा सध्या विचार चालू आहे. मात्र हे लोक मदतीस पात्र असले पाहिजेत. तथापि, अशा लोकांना दाव्याच्या कामीं लागणाऱ्या कोर्टाच्या फीच्या बाबतींत सूट देणें मात्र योग्य होणार नाहीं.


**विजेच्या आकाराची थकबाकी**— आंध्र वीज-बोर्डाला आपल्या ग्राहकांकडून विजेच्या आकाराबद्दल ६८ लाख रुपये यावयाचे आहेत. त्यांत ६·९७ लाख रुपये निजामाकडून, ८·९१ लाख रुपये हैदराबादच्या म्युनिसिपल कॉर्पोरेशनकडून, व ९ लाख रुपये निरनिराळ्या सरकारी खात्यांकडून येणें आहेत. पब्लिक अकौंटस कमिटीच्या अहवालांत वरील माहिती देण्यांत आली आहे.

**मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष**—रांची येथें १४ वी मानसोपचार परिषद् भरली होती. परिषदेला निरनिराळ्या भागांतून ५० प्रतिनिधी आले होते. परिषदेंतील शास्त्रीय चर्चेचें उद्घाटन करतांना भारताचे आरोग्यमंत्री श्री. करमरकर म्हणाले कीं, मानसिक आरोग्याकडे भारतांत पुरेसें लक्ष देण्यांत येत नाहीं. भारतांत मानसिक रोगानें पछाडलेल्या लोकांची संख्या १५ लाख असावी, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**अपुरा विकास झालेल्या देशांना मदत**—इंटरनॅशनल डेव्हलपमेंट असोसिएशन ह्या संस्थेनें भारतासारख्या अपुरा विकास झालेल्या देशांना ५० वर्षे मुदतीचीं डॉलर्सचीं कर्जें देण्याची एक योजना तयार केली आहे. संघटनेला जागतिक बँकेचा पाठिंबा आहे. संघटनेच्या योजनेमुळें बऱ्याच देशांचा परदेशीय चलनाचा प्रश्न दीर्घमुदतीपर्यंत सुटण्यास मदत होईल.

**भारताची लोकसंख्या ४३ कोटी**— फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संघटनेच्या वार्षिक सभेंत बोलतांना पंतप्रधान नेहरू ह्यांनीं भारताच्या लोकसंख्येचा उल्लेख केला. १९५१ सालीं लोकसंख्या ४० कोटींपेक्षा कमी होती. आतां ती ४३ कोटींच्या घरांत गेली असावी असा अंदाज आहे. म्हणजे गेल्या दहा वर्षांत लोकसंख्येंत ३ कोटींची भर पडली आहे.

**सहकारी पद्धतीनें तागाची विक्री**—ताग पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था काढून त्यांच्यामार्फत तागाची विक्री करण्याच्या एका योजनेचा पाकिस्तान सरकार विचार करीत आहे. या योजनेसाठी १·४६ कोटी रुपये खर्च येईल. पूर्व पाकिस्तानांतील तागाची विक्री करण्याचें काम बिगर-पाकिस्तानी दलालांच्या हातीं आहे. दलालांची मध्यस्थी काढून टाकण्याचा हा प्रयत्न आहे.



आज

# महाराष्ट्र

एक वर्षाचा झाला

पण त्याबरोबरच तो

भारतामधील इतर प्रदेशाएवढाच

## हजारों वर्षांचा प्राचीन आहे

आपण सर्व

## आदर्श महाराष्ट्रीय

आणि

## आदर्श भारतीय म्हणून

सुखानें नांदू या

प्रकाशन संचालक महाराष्ट्र सरकार मुंबई

# अर्थ

बुधवार, ता. ३ मे, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## मालाच्या खपांत जाहिरातींचें स्थान

हिंदुस्थान लिव्हर लि. ह्या कंपनीचे उपाध्यक्ष श्री. पी. एल. तंडन ह्यांनीं कंपनीच्या सर्वसाधारण वार्षिक सभेंत मालाच्या जाहिरातीबद्दल आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यांपैकीं कांहीं महत्त्वाचे विचार पुढे दिले आहेत. श्री. तंडन म्हणाले कीं, लिव्हर कंपनीच्या मालाचें वांटप विस्तीर्ण भागावर होतें. तथापि तेवढ्यानेंच भागणार नाहीं. माल घेण्यासाठीं ग्राहकांचें मन वळविणें ही महत्त्वाची गोष्ट आहे. ग्राहकाला प्रथम वस्तूची गरज भासली पाहिजे; तरच मालाची विक्री होऊं शकते. म्हणून मालाचें वाटप आणि खप ह्यांच्या दरम्यान मागणी उत्पन्न करण्याचें कार्य करावें लागतें. तें काम जाहिरातींच्या द्वारानें होतें. जाहिरातीबद्दलच्या कल्पना पुष्कळदा स्पष्ट नसतात. कांहीं लोकांच्या मतानें जाहिरात ही अनावश्यक आहे. कांहीं जण तर ह्याहीपुढें जातात आणि असें म्हणतात कीं, जाहिरात म्हणजे आर्थिक अपव्यय व चैनीची बाब आहे; पण तसें नाहीं. जाहिरातीमुळें मालाची मागणी अधिक वाढते आणि त्यामुळें उत्पादनाला चालना मिळते; आणि अधिक उत्पादन होऊं लागलें म्हणजेच मालाच्या उत्पादनाचा खर्च कमी करतां येणें शक्य होतें. उत्पादनाचा खर्च कमी व्हावा म्हणून मालाचा दर्जा उतरविणें बरोबर नाहीं. वाढत्या विक्रीमुळेंच उलट उत्पादनाच्या खर्चांत बचत होते. म्हणून स्वतंत्र समाजरचनेंत जाहिराती ह्या एक महत्त्वाचें आर्थिक कार्य करीत असतात. त्या कार्याचा खर्चहि अगदीं थोडा असतो. हिंदुस्थान लिव्हर कंपनीच्या रु. १०० च्या मालविक्रीमागें अवघा रु. २-८ नये पैसे इतकाच जाहिरातीचा खर्च येतो. जाहिरातींमुळें ग्राहकाला मालासाठीं अधिक किंमत द्यावी लागते असेंहि नाहीं. उलट, विक्री वाढल्यामुळें माल स्वस्त विकणें परवडतें व अंतीं ग्राहकांचाच फायदा होतो. शिवाय जाहिरातीमुळें मागणी नियमित येत राहते. त्यामुळें कारखाने सतत चालू राहूं शकतात. जाहिरातींमुळें कारखान्यांमधून घाऊक व्यापाऱ्याकडे आणि त्यांच्याकडून किरकोळ व्यापाऱ्याकडे मालाचा प्रवाह एकसारखा चालू राहतो. ह्या प्रवाहाची गति जितकी जास्त असेल त्या मानानें कारखान्यांना खेळतें भांडवलहि कमी लागतें. मालाची उलाढाल जलद झाल्यामुळें व्यापाऱ्यांनाहि कमी नफ्यावर धंदा करणें शक्य होतें. एकंदरीनें जाहिरातीमुळें कारखान्यांना अनेक तऱ्हेचे लाभ होतात. त्यांना आपला माल लाखों घरांपर्यंत पोंचवितां येतो. ग्राहकांना मालाच्या दर्जाबद्दल खात्री वाटूं लागते; उत्पादन-खर्चांत बचत होते व खेळतें भांडवल कमी पुरूं लागतें.

लिव्हर कंपनी ही ग्राहकांना लागणाऱ्या रोज खपाच्या वस्तु पुरवीत असते त्यामुळें कंपनीच्या जाहिराती विस्तीर्ण क्षेत्रांवर पसरल्या जाणें अपरिहार्यच आहे. शहरें व खेडीं ह्यांत राहणाऱ्या लाखों लोकांपर्यंत कंपनीला आपला माल पोचवावयाचा असतो. त्यामुळें जाहिरातींच्या जितक्या साधनांचा उपयोग करतां येईल तितका करून घ्यावा लागतो. जाहिरातींचें स्वरूप दोन प्रकारचें असतें; प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष. पहिल्या प्रकारांत ग्राहकांचें मन वळविण्यावर अधिक भर असतो. मालाचा नमुना त्याला दाखवून, व मालाचा उपयोग कसा करावा हें सांगून माल घेण्यास त्याला प्रवृत्त करण्यांत येतें. अप्रत्यक्ष जाहिराती म्हणजे वृत्तपत्रांतील व सिनेमांतील जाहिराती, अगर चित्रपट. ह्या जाहिरातीचाहि चांगला उपयोग होतो, असा अनुभव आहे.

ग्राहकांपर्यंत पोंचण्यास बहुधा गृहिणींचा उपयोग करण्यांत येतो. गृहिणींना भेटून मालाचा वापर कसा करावा तें सांगण्यांत येतें. शिवाय वृत्तपत्रांच्या व चित्रपटांच्या द्वारांहि त्यांना मालाची पुन्हा पुन्हा आठवण करून देण्यांत येते. गृहिणी एखाद्या दुकानांत खरेदी करण्यासाठीं शिरते तेव्हां दुकानांत मांडलेल्या मालाच्या साह्यानेंहि तिचें मन आकृष्ट करण्यांत येतें. जाहिरातीनें ग्राहकांचें मन आकर्षित करून घ्यावें हें तर महत्त्वाचें आहेच; पण जाहिरात ही नेहमींच प्रामाणिकपणाची व योग्य अशी असली पाहिजे. मालाच्या गुणाबद्दल जाहिरातींच्या द्वारां जें सांगण्यांत येतें तें खरें आहे ह्याबद्दल ग्राहकांची खात्री पटविली पाहिजे. म्हणून लिव्हर कंपनीच्या सर्व जाहिरातींचे मसुदे कायद्याच्या तज्ज्ञांकडून व तांत्रिक तज्ज्ञांकडून आधीं तपासले जातात. जाहिरातींत मालाबद्दल करण्यांत आलेलीं विधानें योग्य आहेत ह्याबद्दल अशा तऱ्हेनें खात्री करून घेण्यांत येतें. एखाद्या कारखान्याचें भांडवल जसें मोजता येतें तसें जाहिरातीवरील खर्चाचें मूल्यमापन करता येणार नाहीं. उत्पादनाच्या सोयी अधिक चांगल्या करण्यासाठीं केलेल्या खर्चाचा परिणाम जसा अचूक सांगतां येईल तसा जाहिरातींच्या खर्चाचा सांगतां येणार नाहीं. तरी पण जाहिरातीवर पुष्कळ खर्च होत असतांना त्याच्या परिणामाचें मूल्यमापन करण्याची कांहींतरी पद्धत शोधून काढणें अगत्याचें आहे. जाहिरातींचा परिणाम अजमावण्याच्या नव्या पद्धतीचा अवलंब करून आणि आंकडेशास्त्राच्या साह्यानें अशी पद्धत शोधण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे. विक्रीचें पृथक्करण, आणि बाजारपेठांचें संशोधन ह्यांचेंहि साह्य ह्या कामीं घेण्यांत येत आहे.

---

## डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशन

बँकांकडील ठेवींच्या विम्याची योजना अंमलांत आणण्यासाठी एका कॉर्पोरेशनची स्थापना करणारें बिल पार्लमेंटच्या येत्या बैठकींत मांडण्यांत येणार आहे. कॉर्पोरेशनच्या बोर्डावर रिझर्व्ह बँक, स्टेट बँक, शेड्यूल्ड बँका, मध्यवर्ती अर्थ खातें, ह्यांचे प्रतिनिधी असतील. कॉर्पोरेशनचा चेअरमन कोण असावा, हें अद्याप निश्चित झालेलें नाहीं. विम्याचे हप्ते बँका देतील. १,००० रु. पर्यंतच्या ठेवींना विम्याचें संरक्षण मिळावें, असें अर्थखात्याचें म्हणणें आहे तर बँकांना ती मर्यादा १,५०० रु. पर्यंत हवी आहे. १,५०० रुपयांच्या मर्यादेंत ८०% ठेवींचा समावेश होईल.

## युनायटेड बँक ऑफ महाराष्ट्र होण्याचा योग नव्हता!

युनायटेड बँक ऑफ इंडिया लि., ही बंगालमधील चार बँकांच्या विलिनीकरणांतून दहा वर्षांपूर्वी निर्माण झाली. तेथील नाथ बँकेसारख्या बँका बुडाल्या, ह्या परिस्थितीपासून योग्य तो धडा घेऊन बंगाल सेंट्रल बँक, कोमिल्ला बँकिंग कॉर्पोरेशन, कोमिल्ला युनियन बँक आणि हुगळी बँक ह्या १८ ते ३२ वर्षांपूर्वीच्या जुन्या बँका यशस्वीपणें एकत्र आल्या, आणि १८ डिसेंबर, १९५० रोजीं त्यांतून युनायटेड बँक ऑफ इंडिया ही मोठी बँक निर्माण झाली. गेल्या दहा वर्षांत, ह्या बँकेकडील ठेवी २६·९० कोटि रुपयांवरून ५१·७४ कोटि रुपयांवर गेल्या, कर्जे १३·९५ कोटि रु. चीं ३१·६२ कोटि रु. झालीं, २४ नव्या शाखा उघडल्या गेल्या आणि १९६० मध्यें तिला १४·६३ लक्ष रु. नफा झाला.

युनायटेड बँक ऑफ इंडियाची आतां आठवण होण्याचें कारण, त्या बँकेच्या धर्तीवर महाराष्ट्रीय बँकांनीं एकत्र यावें, अशी महाराष्ट्रीय बँकांना श्री. चिं. वि. जोग, बी.कॉम., एफ. आय. बी. (लंडन) ह्यांनीं २९ ऑक्टोबर, १९५२ च्या "अर्थ" मध्यें एक लेख लिहून जाहीर विनंती केली होती. अशा एकत्रीकरणांतून एक मोठी बँक निर्माण होण्यामुळें होणारे फायदे आठ बँकांचा एकत्रित ताळेबंद मांडून त्यांनीं दिग्दर्शित केले होते. "परिस्थितीनें ठेचा दिल्यावरच जागें होण्यांत काय स्वारस्य आहे? सर्व हितसंबंधीयांनीं ह्याचा दक्षतेनें विचार करावा" असा त्यांनीं जाहीर इशारा दिला होता. ४ नोव्हेंबर, १९५३ च्या "अर्थ"मध्यें त्यांनीं पुनः एक लेख लिहून त्यांच्या योजनेवरील आरोपांचें व गैरसमजांचें निराकरण केलें होतें. "एकत्रीकरणाचे बाबतींत रिझर्व्ह बँकेनेंच गतिमान व्हावें, असें म्हणण्याइतकें आम्हीं का अगतिक व्हावें? आपल्या गरजा काय आहेत हें रिझर्व्ह बँकेनें आपणांस सांगण्यापेक्षा आपणांस काय हवें, हें आपणच त्यांच्या कानावर घालणें ह्यांत काय गैर आहे?" असें त्यांनीं विचारलें होतें. "रिझर्व्ह बँकेच्या हातीं कायद्यानें पुष्कळच सत्ता आली आहे, तिचा वापर निरोगी अशा बँकिंग प्रवृत्तीची वाढ होईल अशाच तऱ्हेनें होत आहे. तेव्हां बँका बुडण्याचे प्रकार होणारच नाहींत व रिझर्व्ह बँक प्रत्येक बँकेस योग्य दिशा दाखवील" ह्या मतप्रदर्शनाला श्री. जोगांनीं उत्तर दिलें होतें, "आज कायदा झाल्यानंतर तीन वर्षांनींहि बँका बुडल्याच आहेत; ह्यापुढें बँका बुडण्याचे प्रकार होणारच नाहींत हें म्हणणें चुकीचें आहे."

श्री. जोग ह्यांनीं आठ वर्षांपूर्वी दिलेला इशारा त्या वेळीं लक्षांत घेतला गेला असतां, तर महाराष्ट्रीय बँकांची बरोबरीच्या नात्यानें ऐच्छिक एकत्रीकरणाच्या द्वारां एक मोठी बँक निर्माण करण्याचें, 'युनायटेड बँक ऑफ महाराष्ट्र'च्या स्थापनेचें श्रेय सर्वांना मिळालें असतें. पण, तसें होण्याचा योग नव्हता!

---

### ताजमहालच्या रात्रीं दर्शनास २० नये पैसे

ताजमहाल रात्रीं पाहावयास जाणारांना आतां माणशीं २० नये पैसे द्यावी लागतील. दिवसा प्रवेश पूर्वीप्रमाणेंच मोफत राहील.

---

### नाशिक येथील नोट छपाईचें वाढतें काम

नाशिक येथील सिक्युरिटी प्रेसनें १९६० मध्यें १,०४९·२ कोटी रु. किंमतीच्या २३६ कोटी वेगवेगळ्या नोटा छापल्या. सध्यांची छापखान्याची जागा अपुरी पडूं लागल्यामुळें नवीन छापखाना शेजारींच उभारण्यांत येत आहे.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

रजिस्टर्ड ऑफिस: ११७७, बुधवार पेठ, पुणें शहर

—: भांडवल :—

| | |
|---|---|
| वसूल भांडवल ... ... | रु. ३५,००,००० चे वर |
| गंगाजळी व इतर निधि ... | रु. १७,१०,००० |
| खेळतें भांडवल ... | रु. १६ कोटींचे वर |

★ महाराष्ट्र, आंध्र, म्हैसूर आणि मध्यप्रांतांत मिळून बँकेच्या ६६ शाखा

★ सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

★ स्टर्लिंग व डॉलर करन्सीमधील प्रवासी चेक्स विकत मिळतात

★ परदेशी लेटर्स ऑफ क्रेडिट उघडलीं जातात

— २७ मार्च, १९६१ पासून सुरू झालेल्या १४ नव्या शाखा —

अर्वी, चांदा, धामणगांव, दुर्ग (मध्यप्रदेश), गोंदिया, हिंगणघाट, पुलगांव, राजनांदगांव (मध्यप्रदेश) वर्धा, वरोरा, वणी, नागपूर (१ धरमपेठ, २ इतवारी)

जनरल मॅनेजर

## कंपन्यांच्या व्यवस्थापनावरील खर्चाच्या मर्यादा

कंपनी कायद्यांत दुरुस्ती करतांना केवळ कायद्याच्या दृष्टीचाच विचार न करतां, सामाजिक व आर्थिक उद्दिष्टांचाहि विचार करण्यांत आला आहे आणि मॅनेजिंग एजंट्स, डायरेक्टर्स, मॅनेजर्स, इत्यादींच्या वेतनावर बंधनें घालण्यांत आलेलीं आहेत.

१९८ व्या कलमान्वयें डायरेक्टर्स, मॅनेजिंग एजंट्स, सेक्रेटरीज अँड ट्रेझरर्स, किंवा मॅनेजर ह्या सर्वांना मिळून कंपनीनें दिलेलें वेतन तिच्या निव्वळ नफ्याच्या ११% पेक्षा अधिक असतां कामा नये. तांत्रिक तज्ज्ञ, रिसीव्हर, ट्रस्टी, इत्यादि नात्यानें केलेल्या कामाबद्दलचा मोबदला ह्या ११% च्या मर्यादेचे बाबतींत विचारांत घेतला जाणार नाहीं. कंपनीच्या सेक्रेटरीला दिलेलें वेतनहि ह्या मर्यादेंत समाविष्ट नाहीं. मॅनेजिंग एजंटला दिलेलें खरेदी किंवा विक्री ह्यावर दिलेलें कमिशनहि स्वतंत्र राहील.

व्यवस्थापकवर्गाच्या वेतनाचा कंपनीच्या नफ्या–तोट्याशीं मुद्दामच संबंध जोण्यांत आला आहे. एखाद्या वर्षीं कंपनीला नफा झालाच नाहीं, किंवा फारच थोडा झाला, तर ! अशा वेळीं, कंपनीच्या भांडवलांतनहि व्यवस्थापकांना वेतन मिळालें पाहिजे, असें स्पष्ट करण्यांत आलें आहे; मध्यवर्ती सरकारच्या मंजुरीनें डायरेक्टर्स, मॅनेजिंग एजंटस, मॅनेजर, इत्यादींना मिळून ५०,००० रुपयांपर्यंत "किमान वेतन" घेण्यास हरकत नाहीं. १९८ व्या कलमांत दुरुस्ती होण्यापूर्वी, असें किमान वेतन डायरेक्टर बोर्डच मंजूर करूं शकत असे. सरकारच्या मंजुरीची आवश्यकता नसे. कांहीं कंपन्यांचे बाबतींत ५०,००० रु. ची किमान वेतनाची मर्यादा वाढवून देणें मध्यवर्ती सरकारला आवश्यक वाटलें, तर तें ती मर्यादा वाढवूं शकेल.

३०९ व्या कलमांत दुरुस्ती होण्यापूर्वी, डायरेक्टराला प्रत्येक सभेसाठीं फी किंवा मासिक रक्कम किंवा कांहीं अंशीं फी व कांहीं अंशीं मासिक रक्कम मिळण्याची तरतूद होती. दुरुस्ती कायद्यानें, मासिक रकमेला बंदी घातली आहे. कंपनी स्पेशल ठराव करून, डायरेक्टरांना निव्वळ नफ्याच्या कमाल ३% पर्यंत कमिशन देऊं शकेल. कंपनीला पूर्ण वेळ काम करणारा डायरेक्टर, मॅनेजिंग एजंट किंवा मॅनेजर असेल, तर सामान्य डायरेक्टरांना निव्वळ नफ्याच्या १% पेक्षा एकूण रक्कम दिली जाणार नाहीं. मध्यवर्ती सरकारच्या मंजुरीनें कमिशनचें हें प्रमाण ( अनुक्रमें ३% व १% ) वाढवून घेतां येईल.

रमाबेन ए. ठाणावाला वि. ज्योति लि. ह्या दाव्यांत मुंबई हायकोर्टानें निर्णय दिला होता, कीं ३०९ व्या कलमांतील डायरेक्टराच्या कमाल वेतनाचा हिशेब करतांना, त्यानें इतर भूमिकेंत काम केल्याबद्दल मिळालेलें वेतन विचारांत घेतलें जाणार नाहीं. कंपनीचा डायरेक्टर ह्या नात्यानें त्याला मिळणाऱ्या वेतनासच कमाल वेतनाचें बंधन लागूं आहे. उदाहरणार्थ, त्याची डिबेंचर होल्डर्सच्या कारवाईत रिसीव्हर किंवा ट्रस्टी म्हणून नेमणूक झाली असेल, तर त्याबाबतचें वेतन ३०९ व्या कलमाचे कक्षेबाहेर राहील. कंपनीनें डायरेक्टराला पात्रतेचे शेअर्स दिले असतील व कंपनीचे हितसंबंध पाहण्यासाठी त्याची दुसऱ्या कंपनीच्या बोर्डावर नेमणूक केली असेल, तर त्या कंपनीनें दिलेल्या फीवर त्याचा अधिकार राहणार नाहीं.

मॅनेजिंग एजंटांना मिळावयाच्या कमिशनला ३४८ वें कलम लागूं आहे. पब्लिक कंपनी किंवा तिची सब्सिडिअरी कंपनी आपल्या मॅनेजिंग एजंटाला वर्षांतील निव्वळ नफ्याच्या १०% पेक्षा जास्त वेतन देऊं शकणार नाहीं. तांत्रिक सल्लागार, ट्रस्टी, रिसीव्हर, ह्या नात्यानें दिलेलें वेतनहि ह्या १०% च्या हिशेबाचे वेळीं विचारांत घेतलें जाईल. एखादी कंपनी किंवा फर्म मॅनेजिंग एजंट असेल, तर त्या कंपनीचे डायरेक्टर, प्रायव्हेट कंपनीचा सभासद आणि फर्मचा पार्टनर ह्यांना दिलेलें वेतनहि १०% मध्येंच समाविष्ट होईल.

मोफत राहण्याची सोय, मोफत प्रवास, मोफत मोटर, विमा, पेन्शन, वर्षासन, ग्रॅच्युइटी, ह्या सर्वांचा एकूण वेतनांत विचार केला जाईल; कारण, त्यामुळें कंपन्यांचा खर्च वाढतो आणि फायदा मिळणाऱ्याची आर्थिक समृद्धि होते.

मॅनेजिंग डायरेक्टर, मॅनेजिंग एजंट, सेक्रेटरीज अँड ट्रेझरर्स, मॅनेजर, ह्यापैकीं एकाच प्रकारची व्यवस्थापना कंपनीला करतां येईल; म्हणजे व्यवस्थापनेचें वेतन ११% पेक्षा कधींच जास्त होऊं शकणार नाहीं. कारण, मॅनेजिंग एजंटाची कमाल प्राप्ति १०%, सेक्रेटरीज अँड ट्रेझरर्सची ७½%, आणि मॅनेजर किंवा मॅनेजिंग डायरेक्टरची ५% आहे.

कारभाराचें स्वरूप, कंपनीचा आकार, मागील कामाचा आढावा, ह्यांचा विचार करून, कमाल वेतनांतहि काटछाट करण्याचा अधिकार सरकारला आहे.

---

## भारतामधील खनिज तेलाच्या शुद्धीकरणाचा कारखाना

भारताच्या अर्थव्यवस्थेंत खनिज तेलाचा पुरवठा हा एक कच्चा दुवा आहे. खनिज तेलाच्या शोधाचे अलीकडे जे प्रयत्न करण्यांत आले त्यांना कांहीं यश लाभलें आहे. गुजरातमधील भूमिगत तेलाचा शोध हें त्याचेंच गमक आहे. तथापि, तेलाचा सांठा सांपडला तरी त्याचें शुद्धीकरण होऊं लागून व्यापारी प्रमाणांत त्याचा पुरवठा होऊ लागणें कालावधीची बाब आहे. भारताचे खाण–तेलमंत्रि श्री. के. डी. मालवीय ह्यांनीं ह्यासंबंधीं दिलेली माहिती उत्साहजनक आहे. लोकसभेच्या अनौपचारिक सल्लागार समितीपुढें बोलतांना ते म्हणाले कीं गुजरातमध्यें अंकलेश्वर ह्या ठिकाणीं तेलाच्या ७ विहिरी खोदण्यांत आल्या आहेत. त्यांत मिळालेल्या तेलाचे चांचणीचें शुद्धीकरण चालू वर्षाच्या सप्टेंबर महिन्यापासून सुरू होण्याचा संभव आहे. अंकलेश्वर येथील भूमिगत तेलाच्या सांठ्याचें प्रमाण आणि तेलाचे व्यापारी दृष्टीनें उत्पादन ह्यांची निश्चिति करण्यासाठी आणखी १०० वर विहिरी खोदण्याची आवश्यकता आहे. गुजरातमध्यें सांपडलेलें तेल शुद्ध करण्यासाठी एक कारखानाहि गुजरात राज्यांतच स्थापन करण्याचा विचार करण्यांत येत आहे. ह्या कारखान्यांत दरसाल २० लाख टन शुद्ध करण्यांत येणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत तेल शुद्ध करणाऱ्या खाजगी कारखान्यांची उत्पादनक्षमता वाढविण्याचा सरकारचा विचार नाहीं. सध्यां खाजगी मालकीच्या कारखान्यांतून ६० लाख टन तेल शुद्ध करण्यांत येतें. सार्वजनिक मालकीचें तेल शुद्ध करण्याचे तीन कारखाने १९६५ मध्यें सुरू होतील असा अंदाज आहे ते सुरू झाल्यावर आणखी ४७ लाख टन तेल शुद्ध होऊ लागेल. नियोजन समितीनें देशांतील तेलाच्या खपाचा जो अंदाज तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत केला आहे तितकें तेल मग निर्माण होऊ लागेल.

---

## चीनमध्यें दुष्काळ, पण परदेशी मदतीस नकार

चीनमधील दुष्काळी परिस्थितीमुळें होणारे हाल वांचविण्यासाठीं अमेरिकेनें रेडक्रॉस मार्फत चीनला बराचसा गहूं देऊं केला होता, पण चीननें त्याचा स्वीकार न करण्याचें ठरविलें आहे.

## महाराष्ट्राच्या पहिल्या वाढदिवसाच्या निमित्तानें

## पुणें जिल्ह्यानें तीन सहकारी भेटी मराठी जनतेला दिल्या आहेत.

- ★ सोमेश्वर सहकारी साखर कारखाना;
- ★ छत्रपति शिवाजी सहकारी हिरडा कारखाना; आणि,
- ★ सहकारी छापखाना

**सहकारी चळवळीचा जीवनव्यापी विकास सूचित करणाऱ्या या तीनहि संस्थांना भक्कम बँकेचा भक्कम आधार आहे.**

**नव-महाराष्ट्राच्या सेवेंत —**

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

लक्ष्मी पथ, पुणें २.

★ वसूल भाग भांडवल बेचाळीस लाख ★ ठेवी सत्त्यातीन कोटीचेवर

★ २७ शाखा ★ खेळतें भांडवल पांच कोटींचे वर.

**वा. ग. अळतेकर**
कार्यकारी संचालक.

**शि. म. काळे,** एम. एल. ए.,
अध्यक्ष.



॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

अहो गुळा साखरे मालेयाचे । हे बांधे तरी एकाची रसाचे ॥
परि स्वाद गोडियेचे । आन आन जैसे ॥ (श्रीज्ञानेश्वरी)

**महाराष्ट्र राज्याच्या प्रथम वर्धापनदिनीं जाहीर करण्यास आनंद वाटतो कीं**

**चालू हंगामांत साखरेचें उत्पादन**

# २ लाख पोत्यांचे वर झालें आहे.

कै. वं. गो. आगाशे ह्यांचे अहर्निश कष्टाचें चीज होऊन त्यांनीं ठरविलेल्या धोरणानुसार संचालक मंडळानें मध्यमवर्गीयांचा एकमेव कारखाना यशःप्राप्तीच्या मार्गावर आणला आहे.

ता. ३०-६-१९६० वर्षअखेर कंपनीनें ऑर्डिनरी (इक्विटी) शेअरवर करपात्र द. सा. द. शें. २० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

---

महाराष्ट्र राज्याच्या प्रथम वर्धापनदिनानिमित्त
आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना अभिवादन व हार्दिक शुभेच्छा.

---

**महाराष्ट्र राज्य यशस्वी व चिरायु होवो!**

**के. व्यं. चांफेकर,**
B. E., A. M. I. E.
मॅनेजर.

**शं. ल. लिमये,**
B. Sc., LL. B., वकील.
अध्यक्ष.

## न्यू सिटिझन बँकेच्या ठेवीदारांना किती रक्कम मिळाली ?

२९ एप्रिल, १९६१ रोजीं न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि. ही बँक दि बँक ऑफ बरोडा लि. मध्यें विलीन झाली. सरकारनें मंजूर केलेल्या योजनेप्रमाणें, न्यू सिटिझन बँकेमधील ठेवींचीं खातीं बँक ऑफ बरोडाच्या त्या त्या शाखेंत वर्ग करण्यांत आलीं. खालीलप्रमाणें रकमांनीं तीं खातीं उघडण्यांत आलीं:— (अ) २५० रु. किंवा खात्यांतील शिल्लक जी रक्कम कमी असेल, ती. (ब) २५० रु. पेक्षा जास्त शिल्लक असेल, त्या खात्यांतील २५० रु. वरील रकमेच्या ६६%. ह्याप्रमाणें नव्या खात्यांतून रकमा दाखल करून उरलेली रक्कम 'कलेक्शन' खात्यांत घातली जाईल. सत्वर वसूल होऊं न शकणाऱ्या रकमांची जसजशी वसुली होईल, त्याप्रमाणें ठेवीदारांना प्रमाणशीर दिली जाईल. २९ एप्रिल रोजीं ठेवीदारांच्या नव्या खात्यांकडे सुमारें १ कोटि, ६० लक्ष रु. वर्ग करण्यांत आले. न्यू सिटिझनच्या ३२,३२५ ठेवीदारांपैकी २३,५४१ म्हणजे सुमारें ७३% ठेवीदारांना त्यांच्या सबंध ठेवींची रक्कम परत मिळाली. ह्या २३,५४१ ठेवीदारांच्या खात्यांत प्रत्येकी २५० रु. किंवा त्यापेक्षा कमी रक्कम होती. विलिनीकरणामुळें, बँक ऑफ बरोडाच्या शाखांची संख्या १०५ ची १४९ झाली; महाराष्ट्र राज्यांत त्या बँकेच्या १४ शाखा होत्या, त्या आतां ५५ झाल्या. न्यू सिटिझनचा जवळजवळ सर्व नोकरवर्ग (३२४) बँक ऑफ बरोडामध्यें त्यांच्या नोकरीच्या चालू अटींवर समाविष्ट करून घेण्यांत आला आहे.

### हिंदी चित्रपटांची पाकिस्तानांत चलती

पश्चिम पाकिस्तानांतील शहरांतून व मोठ्या गांवांतून बरेच हिंदी चित्रपट दाखविण्यांत येत आहेत. ह्यांपैकीं बहुतेक चित्रपट १९५० व १९५१ सालीं निर्माण केले गेलेले आहेत. ह्या जुन्या चित्रपटांची पाकिस्तानमध्यें चांगली चलती चालू आहे. पाकिस्तानांतील चित्रपटनिर्मात्यांनीं १९५८ सालीं पाकिस्तान सरकारवर दडपण आणलेल्याचा परिणाम म्हणून सरकारनें भारतामधून बेकायदा रीतीनें आणण्यांत आलेले ३८१ चित्रपट पाकिस्तानांत दाखविण्यास बंदी केली. तेव्हांपासून हे चित्रपट पेटींत पडून होते. ऑगस्ट १९५६ पूर्वी आयात केलेल्या ह्या चित्रपटांपैकीं २० सोडून बाकीचे सर्व, सिनेमागृहांतून दाखविण्याची परवानगी आतां देण्यांत आली आहे. १९५५ पर्यंत भारतामधून पाकिस्तानांत चित्रपट आयात करण्याची कायदेशीर सोयच नव्हती. पण सरकारी नियंत्रणांना न जुमानतां चित्रपट आयात करणें वितरकांना फायद्याचें होत असे. अशा रीतीनें सुमारें ४०० चित्रपट आयात करण्यांत आले असावेत असा अंदाज आहे. चित्रपट आयात करणारे धनिक दर चित्रपटाला २० हजार ते ५० हजार रुपये देत व त्यावर दर फुटामागे १ रुपया दंड भरीत. मग जकात अधिकारी ह्या चित्रपटांचा लिलांव आयात करणाऱ्यालाच देत. अशा खटपटीनें मिळविलेल्या चित्रपटांना सरासरी ५ लाख रुपये उत्पन्न झालें असें म्हणतात. आतां भारत व पाकिस्तान ह्यांच्यांत चित्रपटांच्या आयातीबद्दल १९६० चा करार आहे. पश्चिम पाकिस्तानांत सुमारें ५०० चित्रगृहें आहेत. त्यांपैकी ८० टक्के चित्रगृहें उर्दू अगर हिंदी चित्रपट लावतात. १९५८ नंतर त्यांना चित्रपट मिळेनात, म्हणून तीं सिनेमागृहें बंद करण्याची पाळी आली होती. पण आतां तीं पुन्हा जोरानें चालू झालीं आहेत.

### पाश्चात्य जीवनपद्धतीमधील समस्या

समाजशास्त्रज्ञ माणसाचें वर्णन हत्यारें वापरणारा प्राणी म्हणून करतात. गेल्या शंभर–दीडशें वर्षांत मनुष्य एका मागून एक प्रभावी हत्यारें वापरीत आलेला दिसून येतो. रशिआनें अंतराळ-प्रवासांतील पहिला महत्त्वाचा टप्पा म्हणून युरी गागारिन ह्या वैमानिकाला पृथ्वीभोंवतीं १॥ तास फिरवून परत आणलें. अंतराळ–प्रवासासाठी वापरण्यांत आलेला उपग्रह आतांपर्यंतचें सर्वांत प्रभावी हत्यार समजण्यास हरकत नाहीं. औद्योगिक-दृष्ट्या पुढारलेला समाज म्हटला कीं त्यांत सुधारलेल्या हत्यारांचा म्हणजेच यंत्रांचा वापर हा आलाच. यंत्रयुगांत मनुष्याला अतिशय धावपळीचें जिणें जगावें लागतें व त्याचा परिणाम म्हणून दोन घटका सर्व जग विसरावें असें त्याला वाटूं लागतें. अर्थात् विसर पाडून घेण्याचीं साधनें माणसागणिक वेगळीं असूं शकतील. पाश्चात्य देशांत मानसिक सौख्य देण्यासाठीं निरनिराळ्या प्रकारच्या गोळ्या अलीकडे मोठ्या प्रमाणावर वापरण्यांत येऊं लागल्या आहेत. चिंता व मानसिक ताण ह्यांना तात्पुरता विराम देण्याच्या कामीं ह्या गोळ्यांचा वापर दारूपेक्षाहि अधिक प्रमाणांत करण्यांत येऊं लागला आहे. दारूवर जबर कर लादला गेल्यानें दारू पिणें सामान्य लोकांना पुष्कळदा अशक्य होतें. म्हणूनहि गोळ्यांचा खप वाढला असणें शक्य आहे. ह्या गोळ्यांची तरी गरज कां भासते? आधुनिक जीवनांतील अनिश्चितता माणसाला एकसारखी टोंचत असते. त्यामुळें कोणत्या तरी युक्तीनें तात्पुरती सुरक्षिततेची भावना अनुभवतां येत असेल तर ती त्याला हवी असते. माणसाच्या मेंदूवर तात्पुरता परिणाम करणाऱ्या गोळ्या ही सुरक्षिततेची भावना निर्माण करूं शकतात. म्हणून त्यांचा खप वाढत चालला आहे असें तज्ज्ञांचें मत आहे.

### रशिया आघाडी कां मारूं शकला !

रशियन शास्त्रज्ञांनीं व तंत्रज्ञांनीं अंतरिक्षयानांतून माणूस पाठवून त्याला परत पृथ्वीवर आणण्यांत यश मिळविल्यामुळें पाश्चात्य देशांतील लोकांत व सरकारांत बरीच खळबळ माजलेली आहे. सुमारें ४५ वर्षांपूर्वी ज्या देशांतील बहुसंख्य जनता निरक्षर होती त्या देशानें अंतराळ–प्रवासाच्या बाबतींत आघाडी मारल्यामुळें त्यांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. पण आजचा रशिआ आणि चाळीस–पन्नास वर्षांपूर्वीचा रशिआ ह्याच्यांत आतां साम्य राहिलेलें नाहीं. १९१७ च्या क्रांतीनंतर रशिआनें आपलें औद्योगीकरण झपाट्यानें करून घेतलें. औद्योगीकरण साधतांना रशिआंतील जनतेला जबर किंमत द्यावी लागली हें खरें; पण ही किंमत देऊन कां होईना रशिआ आज शास्त्रीय बाबतींत आघाडीवर आलेला आहे. रशिआनें उपग्रहांच्या बाबतींत जी विलक्षण प्रगति केली आहे तिचें श्रेय जर्मन शास्त्रज्ञांना बऱ्याच प्रमाणांत द्यावें लागतें. दुसऱ्या महायुद्धांत रशियन लष्कर बाल्टिक समुद्राच्या किनाऱ्यावर पोंचले त्या वेळीं त्यानें जर्मनीच्या रॉकेटच्या तळांचा ताबा घेतला आणि तेथील ७० टक्के शास्त्रज्ञांस पकडून रशिआंत नेलें. त्यांच्या मदतीनें रशिआनें रॉकेटवरील संशोधनास प्रारंभ केला. रशिआप्रमाणेंच अमेरिकेनेहि कांहीं जर्मन शास्त्रज्ञ हस्तगत करण्यांत यश मिळविलें. तथापि अमेरिकेला रॉकेटच्या शास्त्रांत रशिआइतकी प्रगति करतां आलेली नाहीं. अमेरिका भरपूर पैसे खर्च करण्यास तयार नव्हती असें नव्हे; पण रशिआनें जितक्या चिकाटीनें व जिद्दीनें प्रयत्न केले तितके अमेरिकेनें केले नाहींत असें सांगण्यांत येत आहे.

## चहा

### निर्गत व्यापारांतील स्थान

परदेशी हुंडणावळ मिळवून देणाऱ्या जिनसांत चहाचा भारतांत पहिला क्रमांक आहे. त्यापासून करप्राप्तीहि फार मोठी होते. १८२३ मध्यें, आसाममध्यें चहाचीं झाडें रानटी स्वरूपांत होतीं. १८३९ मध्यें हिंदी चहा प्रथमच लंडनच्या बाजारांत विकला गेला. १८५७ मध्यें ग्रेटब्रिटनमध्यें ७ कोटी पौंड चहा खपला, त्यांपैकी फक्त ३% हिंदी होता. १९०० मध्यें ग्रेटब्रिटननें २५ कोटी पौंड चहाची आयात केली, त्यांपैकी ५५% चहा हिंदी होता. सर्वांत जास्त चहा निर्गत करणारा देश बनण्याचा मान भारताला १९०६ मध्यें मिळाला.

### चहाचें उत्पादन

| वर्ष | हिंदी उत्पादन (कोटी पौंड) | जागतिक उत्पादन (कोटी पौंड) | जागतिक उत्पादनाशीं प्रमाण % |
|---|---|---|---|
| १९३५ | ३९ | ९२ | ४२·९ |
| १९५३ | ६१ | १४६ | ४१·३ |
| १९५४ | ६४ | १६६ | ३८·६ |
| १९५५ | ६७ | १७२ | ३८·७ |
| १९५६ | ६७ | १८१ | ३६·८ |
| १९५७ | ६७ | १७७ | ३८·३ |
| १९५८ | ७१ | १९५ | ३६·६ |
| १९५९ | ७२ | १९८ | ३६·१ |
| १९६० | ७० | १९८ | ३५·१ |

दुसऱ्या महायुद्धामुळें आणि त्यानंतरच्या राजकीय स्थित्यंतरामुळें चहाच्या नकाशांत खूपच फरक घडून आले. इंडोनेशिआचें चहाच्या उत्पादनांतील महत्त्व कमी झालें, भारतानें ७४,००० एकर पीक पाकिस्तानाला गमावलें आणि पूर्व आफ्रिकेचें महत्त्व वाढलें.

### हिंदी चहाची निर्गत : जागतिक बाजारपेठेंतील स्थान

| वर्ष | हिंदी निर्गत (कोटी पौंड) | जागतिक निर्गत (कोटी पौंड) | जागतिक निर्गतीशीं प्रमाण % |
|---|---|---|---|
| १९३५ | ३२ | ८४ | ३९·१ |
| १९५३ | ५० | १०४ | ४८·२ |
| १९५४ | ४५ | ११० | ४०·८ |
| १९५५ | ३७ | ९९ | ३७·१ |
| १९५६ | ५२ | ११८ | ४४·४ |
| १९५७ | ४४ | ११३ | ३९·२ |
| १९५८ | ५१ | १२४ | ४१·० |
| १९५९ | ४७ | ११९ | ३९·८ |
| १९६० | ४२ | १२० | ३५·० |

---

### लोहमिश्रित मातीची जपानकडे निर्यात

चालू वर्षी जपान भारताकडून २० लक्ष टन लोहमिश्रित माती आयात करील. ६२ ते ६५% लोखंड असणारी मातीच जपान घेईल आणि पहिल्या १० लक्ष टनांपैकी प्रत्येक टनाला ८२ शिलिंग देईल. त्यानंतरच्या प्रत्येक टनाला ८० शिलिंग देईल. गेल्या वर्षी जपाननें मंदीच्या कारणासाठी किंमत उतरविण्याची "विनंती" भारताला केली होती, त्याप्रमाणें भारत सरकारनें ८० शिलिंगला मान्यता दिली होती. आतां पोलादाचा धंदा तेजींत आहे, तेव्हां किंमत पुन: ८२ शिलिंग करावी असें भारत सरकारनें सुचविलें. तडजोड म्हणून वरीलप्रमाणें किंमत ठरली आहे.

**वर्धा गांवाची सामाजिक पाहणी**—अखिल भारतीय सर्व-सेवा संघातर्फे वर्धा गांवाची सामाजिक आर्थिक पाहणी करण्यांत येणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत वर्ध्याचा विकास घडवून आणण्यासाठी ही पाहणी करण्यांत येत आहे. ह्या कामासाठी २ कोटी रुपयांची एक योजना आखण्यांत आली आहे. पाहणीच्या कामांत राज्यसरकार सहकार्य करणार आहे.

**साखर पडून राहिल्यामुळें संकट**—इंडिअन शुगर मिल्स असोसिएशननें साखरेच्या धंद्यावरील संकटासंबंधीं उसाचे शेतकरी, त्यांच्या संघटना, राज्यसरकारें व मध्यवर्ती सरकार ह्यांना नोटिसा पाठविल्या आहेत. साखर कारखान्यांच्या गुदामांत शिल्लक असलेल्या साखरेच्या विक्रीची व्यवस्था लवकर झाली नाहीं तर कारखान्यांना शेतकरी अगर सरकार ह्यांचें देणें देतां येणार नाहीं, असें नोटिसींत बजावण्यांत आलें आहे.

**वैमानिकांमधील बेकारी**—वैमानिक शिक्षण घेऊन तयार झालेल्या वैमानिकांतहि बेकारी असल्याबद्दल लोकसभेंत चर्चा झाली. चर्चेला सरकारतर्फे असें उत्तर देण्यांत आलें कीं वैमानिकांतील बेकारी हा कांहीं कायम स्वरूपाचा प्रश्न नाहीं. १९५२-५३ मध्यें शिक्षण पूर्ण झालेले सुमारें १०० वैमानिक बेकार होते तर १९५६-५७ मध्यें वैमानिकांचा तुटवडा भासत होता. गेल्या वर्षी ३८ वैमानिकांनीं ते बेकार असल्याबद्दल सरकारला कळविलें होतें.

**अणुशक्तीच्या साह्यानें स्वस्त वीज**— ब्रिटनचे सुप्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ सर जॉन कॉक्रॉफ्ट ह्यांना अणुशक्तीच्या शांततामय उपयोगाबद्दलचें २५,००० डॉलर्सचें पारितोषिक मिळालें आहे. हें पारितोषिक स्वीकारतांना त्यांनीं असें भविष्य वर्तविलें आहे, कीं १९६७ च्या सुमारास ब्रिटनमध्यें अणुशक्तीच्या साह्यानें स्वस्त वीज निर्माण करतां येईल आणि ती इतर औद्योगिक इंधनाइतकीच स्वस्त असेल.

**डॉक्टरांचे साहाय्यक तयार करणार**—डॉक्टर लोकांच्या हाताखालीं काम करणाऱ्या साहाय्यकांना शिक्षण देण्याच्या एका योजनेचा मध्यवर्ती सरकार विचार करीत आहे. ह्या लोकांना सार्वजनिक आरोग्यासंबंधींच्या शिक्षणाबरोबरच रोगविषयक निदान करण्याचें प्राथमिक शिक्षणहि देण्यांत येणार आहे. अर्थात् त्यांना डॉक्टर म्हणून काम करतां येणार नाही.

**छोट्या मोटारींचें उत्पादन**—छोट्या 'जनता' मोटारींचें उत्पादन करणारा कारखाना १९६३ मध्यें उत्पादनास प्रारंभ करील असा अंदाज आहे. कारखाना सुरू झाल्यापासून संपूर्ण बनावटीच्या जनता मोटारी तयार होऊं लागण्यास ३० ते ३६ महिन्यांचा अवधि लागेल. कारखान्याची जागा अद्याप निश्चित करण्यांत आलेली नाहीं.

**मध्यप्रदेश राज्याचा औद्योगिक विकास**—मध्यप्रदेश कारखानदार संघटनेचे अध्यक्ष श्री. दुर्गाप्रसाद् मंढेलिआ ह्यांनीं राज्याच्या औद्योगिक विकासासाठी संघटना ५० कोटी रुपये भांडवल गुंतविण्यास तयार आहे असें जाहीर केलें आहे. सरकारनें उद्योगधंद्यांच्या वाढीस पोषक असें वातावरण निर्माण करावें अशी मागणीहि त्यांनीं केली आहे.

**कुटुंबनियोजनाच्या कामीं मदत**— कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाला मदत म्हणून अमेरिकेच्या फोर्ड फौंडेशननें भारताला व पाकिस्तानला आर्थिक मदत देऊं केली आहे. भारताला ६ लाख डॉलर्सवर रक्कम मिळणार असून तिचा विनियोग कुटुंबनियोजनविषयक संशोधन व शिक्षण ह्या कामी करण्यांत येणार आहे. १९५९ सालींहि भारताला ह्या कामी मदत मिळाली होती.

### होळ नं. २ वि. का. स. सोसायटीतर्फे सत्कार-समारंभ

सहकारी चळवळींत धडाडीनें कार्य करणारे, निंबूत येथील माननीय मुगुटराव साहेबराव ऊर्फ अप्पासाहेब काकडे ( देशमुख ) चेअरमन, श्री. सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि., व पुणें जिल्हा सहकारी ख. विक्री संघ लि., आणि अकलूज भागांतील प्रसिद्ध पुढारी, आमदार श्री. शंकरराव नारायणराव मोहिते चेअरमन, यशवंत सहकारी साखर कारखाना लि. तसेंच श्री. द्वारकोजीराव रामचंद्रराव राजे निंबाळकर ( ऑ. मॅजिस्ट्रेट ) श्री. नानासाहेब बळीबा होळकर ( अखिल भारतीय ऊंस उत्पादन स्पर्धा पारितोषिकाचे मानकरी ) श्री. विजयसिंग सुरसिंगराव निगडे ( देशमुख ) बी. एससी. ॲग्रि. पुरंदर तालुका विकासमंडळाचे सभासद, व श्री. धोंडीबा दाजीबा खोमणे, ऊंस-उत्पादन-स्पर्धेत बक्षीस मिळविलेले व चेअरमन कोऱ्हाळे बु॥ वि. का. स. सो. लि., या सर्वांचा सत्कार-समारंभ गुरुवार दि. २७ एप्रिल १९६१ रोजीं सकाळीं ९ वाजतां, होळ येथें गोडावूनसमोर सभामंडपांत, आमदार श्री. शिवाजीराव महादेव काळे, चेअरमन, पुणें सेंट्रल को. बँक लि., यांचे अध्यक्षतेखालीं झाला. या निमित्तानें होळ येथें द्वितीय क्रीडामहोत्सव साजरा झाला.

---

### स्टॅन्व्हॅक कारखान्यांनीं मिळविलेली हुंडणावळ

मुंबई येथील स्टॅनव्हॅक तेलकंपनीनें ६ वर्षांच्या काळांत १९ कोटी रुपयांपेक्षा अधिक परदेशीय चलन मिळविलें आहे. तेलशुद्धीचा कारखाना १९५४ सालीं चालू झाला. तेव्हांपासून मोटार स्पिरिट व जळणाचें तेल निर्यात करून कंपनी हुंडणावळ मिळवूं लागली. १९५४ ते १९५९ ह्या काळांत कंपनीनें ७·९२ कोटी रुपयांचें परदेशीय चलन मिळविलें; १९६० सालीं तर ५·६५ कोटी रुपयांचे चलन मिळविलें.

---

### नवीन घरबांधणीस मान्यता

महाराष्ट्र राज्यांतील गलिच्छ वस्त्यांचें उच्चाटन करण्याच्या २९ योजनांचे अनुसारानें, गलिच्छ वस्त्यांचे जागीं १३,२९० घरें बांधण्यास महाराष्ट्र सरकारला परवानगी देण्यांत आली आहे. या योजनांवरील अंदाजी खर्च ५३५·९० लाख रुपये असून, स्थानिक स्वराज्य संस्थांचा खर्च वगळून, या योजनांवर प्रत्यक्षांत १८७·५९ लाख रुपये खर्च झाला आहे.

---

### खतांच्या किंमती कमी होण्याची शक्यता

भारताचे अन्नमंत्री श्री. स. का. पाटील ह्यांनीं लोकसभेंत असें सांगितलें कीं, रासायनिक खतांच्या किंमती लवकरच बऱ्याच कमी करण्यांत येणार आहेत. खतांच्या विक्रींत नफा मिळविण्याचा सरकारचा हेतु नाहीं. गेल्या वर्षी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंतील खतांच्या किंमती भारतामधील किंमतींच्या मानानें कमी असल्यानें सरकारला कांहीं फायदा मिळाला हें खरें आहे. १९६१-६२ सालीं भारताला २३ लाख टन नत्रयुक्त खतें लागतील. त्यापैकी ६६ टक्के गरज भागविण्याचा सरकारचा विचार आहे. चहा, कॉफी व ताग ह्यांच्या मळ्यांच्या गरजा संपूर्णपणें पुरविण्यांत येतील; कारण ह्या वस्तूंच्या निर्यातीनें परदेशीय चलनाची प्राप्ति होत असते.

---

### गोरखपूर येथें खत-कारखाना

' फिक्स्ड नायट्रोजन ' तयार करणारा, गोरखपूर येथें एक नवीन खत-कारखाना, ५ कोटी रुपये खर्च करून लवकरच उभारण्याचा मानस भारत सरकारच्या उद्योगमंत्र्यांनीं जाहीर केला आहे.


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




बेडेकर

मसाले, लोणचीं व पापड


आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.

वापरून पाहा.

मुगभाट, मुंबई ४.

शाखा : ठाकुरद्वार, दादर, कोट व पाळ.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४



आज बाजारांत अनेक ब्राम्ही तेलें उपलब्ध आहेत; परंतु ब्राम्ही तेलाच्या मूळ कल्पनेचें श्रेय सांडू बंधूनाच द्यावें लागेल. सांडू बंधूंच्या आयुर्वेदावरील प्राचीन ग्रंथांच्या गाढ्या व्यासंगाचें तें फळ आहे. ह्या ग्रंथांतून 'ब्राम्ही' या अल्पमोली परंतु बहुगुणी वनस्पतींचा, मेंदूच्या अगर उष्णतेच्या विकारांवर उपयोग सांगितला आहे. त्यांवरूनच श्री. दत्तात्रेय कृष्ण सांडू यांना ब्राम्ही वनस्पतीयुक्त तेल करण्याची कल्पना सुचली. औषधी म्हणून अथवा एरव्हीं सुगंधी तेल म्हणून लावण्यास उपयोगी पडणारें बहुगुणी तेल तयार करण्यासाठीं त्यांनीं प्रयोग सुरू केले व भारतांत प्रथम "ओरिजिनल ब्राम्ही तेल" तयार करून तें लोकप्रिय केलें.

महत्त्वाचें पान



१८९९-१९६०

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रा. लि. चेंबूर-मुंबई ७१

### श्रीरामपूर जवळ कागदाचा मोठा कारखाना

श्रीरामपूर जवळ कागदाला लागणारा लगदा व कागद तयार करण्याचा एक मोठा कारखाना स्थापन करण्यांत येणार आहे. महाराष्ट्र शुगर मिल्स, बेलापूर शुगर कंपनी आणि मुंबईमधील कागदाच्या गिरण्यांची यंत्रसामग्री तयार करणारा एक कारखाना ह्यांच्या सहकार्यानें हा उपक्रम हातीं घेण्यांत येत आहे. कारखान्याच्या स्थापनेसाठी ८ कोट रुपये भांडवल लागेल. नगर जिल्ह्यांतील साखरेच्या कारखान्यांतील उसाचीं चिपाडें कच्चा माल म्हणून वापरण्यांत येणार आहेत. संकल्पित कारखान्यांत दररोज १०० टन लगदा व ५० टन कागद तयार होईल असा अंदाज आहे. ब्राझिलमधील शास्त्रज्ञांनीं कागद तयार करण्याच्या कांहीं नवीन पद्धति शोधून काढल्या असून त्यासाठी योग्य अशा प्रकारची यंत्रसामग्रीहि ब्राझिलमध्यें बनविण्यांत आली आहे. ब्राझिलमधील यंत्रसामग्रीच्या नमुन्याबरहुकूमच यंत्रसामग्री बनविण्यांत येणार आहे. त्यामुळें कागदाच्या उत्पादनखर्चांत बरीच बचत होईल. सध्यां साखरेच्या कारखान्यांतील उसाच्या चिपाडांचा उपयोग जळण म्हणून करण्यांत येत असतो. कारखाने जळणासाठी तेलाचा उपयोग करूं लागले म्हणजे उसाचीं चिपाडें कागदाच्या कारखान्यासाठी मिळूं लागतील. संकल्पित कारखान्यांत जो लगदा तयार करण्यांत येईल त्यांपैकी निम्मा लगदा छोट्या कागदाच्या कारखान्यांना कच्चा माल म्हणून पुरविण्यांत येईल. हे कारखानें सध्यां रद्दीचा कागद व चिंध्या ह्यांचा वापर करून कागद बनवीत असतात.

---

### भारत कोणाकडून आयात करतो !

जानेवारी–नोव्हेंबर, १९६० ह्या मुदतींत भारतानें मालाची जी आयात केली, तिच्यापैकी निम्मी आयात अमेरिकन, ब्रिटिश व प. जर्मन मालाची होती. ज्या दहा प्रमुख देशांतून भारतानें आयात केली, त्यांचा तपशील असा :—

| देश | आयात ( कोटी रु. ) |
|---|---|
| अमेरिका | १९७·८३ |
| ग्रेट ब्रिटन | १८२·३३ |
| प. जर्मनी | १०५·४६ |
| जपान | ४७·२१ |
| इराण | ३०·४० |
| इटली | २२·७२ |
| ऑस्ट्रेलिया | १६·६४ |
| साउदि अरेबिया | १६·४९ |
| इजिप्त | १६·४६ |
| फ्रान्स | १६·३५ |

गेल्या वर्षीच्या पहिल्या दहा देशांच्या यादींतील बर्मा आणि रशिया हे आतां गळले असून ऑस्ट्रेलिया आणि इजिप्त ह्यांचा नव्यानें प्रवेश झाला आहे.

---

**कलकत्ता शहराची सुधारणा**—कलकत्ता शहराची सुधारणा करण्याच्या लहानमोठ्या योजना मध्यवर्ती सरकार आखणार आहे. कलकत्ता शहरांतील विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेऊन राज्य सरकार व मध्यवर्ती सरकार ह्यांनीं ह्या बाबतींत लक्ष घालण्याचें ठरविलें आहे. फाळणी झाल्यानंतर कलकत्ता शहरांत लाखों निर्वासित आले. त्यामुळें शहराच्या विकासाचा प्रश्न अधिकच बिकट झालेला आहे.


# पुणें पीपल्स
## को-ऑपरेटिव्ह बँक लि.
२७० सदाशिव पेठ, पेरू गेटाशेजारीं, पुणें.

दिनांक १ एप्रिल, १९६१ पासून ठेवींवरील व्याजाचे दर खालीलप्रमाणें वाढविण्यांत आलेले आहेत. त्याचा फायदा ठेवीदारांनीं अवश्य घ्यावा अशी विनंती आहे :—

| | |
|---|---|
| सेव्हिंग्ज बँक द. सा. द. शें. | ३ टक्के |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट द. सा. द. शें. | ३॥ टक्के |
| मुदत ठेव १२ महिने द. सा. द. शें. | ४ टक्के |
| मुदत ठेव २४ महिने द. सा. द. शें. | ४॥ टक्के |
| मुदत ठेव ३६ महिने द. सा. द. शें. | ५ टक्के |
| रिकरिंग डिपॉझिट २४ महिने द. सा. द. शें. | ३॥ टक्के |
| रिकरिंग डिपॉझिट ३६ महिने द. सा. द. शें. | ४ टक्के |
| रिकरिंग डिपॉझिट ६० महिने द. सा. द. शें. | ४॥ टक्के |

अधिक माहिती बँकेंत कचेरीचे वेळांत मिळूं शकेल.

द. दि. चितळे,
मॅनेजिंग डायरेक्टर.



# दि पूना अर्बन
## को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें २.
२५ शुक्रवार पेठ, म. फुले मार्केटनजिक कॉर्पोरेशन बिल्डिंग
स्थापना ] पुणें २. [ सन १९२४

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. २,००,००० दोन लाख |
| वसूल भाग भांडवल | रु. १,०८,४१० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ५६,५७० |
| ठेवी | रु. ७,०५,८१० |
| खेळतें भांडवल | रु. ८,९५,६८० |

दि. १ मे १९६१ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवींवरील व्याजाचा दर द. सा. द. शें. ३ टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | व्याजाचा दर |
|---|---|
| १ वर्ष | ३½ टक्के |
| २ वर्षें | ४ टक्के |
| ३ वर्षें | ४½ टक्के |
| ५ वर्षें | ५ टक्के |

पुणें, ता. ३ मे १९६१.

पुरुषोत्तम विष्णु कुलकर्णी, सेक्रेटरी. | दिगंबर विष्णु इनामदार, चेअरमन.

## सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.

### चेअरमन, श्री. कल्याणी, ह्यांचें भाषण

[ तारीख १८-४-६१ रोजीं महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि. मुंबईचे प्रेसिडेंट माननीय भाऊसाहेब हिरे यांनीं कराड येथील सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँकेस भेट दिली. त्या वेळीं बँकेचे चेअरमन श्री. नी. आ. कल्याणी यांनीं स्वागतपर भाषण केलें त्यांतील महत्त्वाचा भाग येथें दिला आहे. ]

" आतांपर्यंत या बँकेकडून ३१-३-६१ अखेर एकंदर ४,३३४ शेतकरी बांधवांना ७३,७७,१५० रुपयांचें कर्ज दिलें गेलेलें आहे. त्यांपैकी २०,६८,८५० रुपयांचें कर्ज १५६१ सभासदांना जुनें कर्ज भागविणेस, ५,३८,२०० रुपयांचें कर्ज २७३ सभासदांना जमीनखरेदीस, ११,१२,८५० रुपयांचें कर्ज ७१५ लोकांना विहीर-दुरुस्ती, नवीन विहीर, जमीन-सुधारणा, इत्यादि करतां, ७,८४,१०० रुपयांचें कर्ज २७९ लोकांना इंजिन, ट्रॅक्टर, इत्यादि भारी किंमतीची शेती-उपयोगी यंत्र-सामग्री खरेदी करण्यास दिलेलें आहे. याशिवाय सरकारकडून १९५८-५९ सालापासून विहीर तगाई व त्यानंतर इंजिन तगाईचें काम या बँकेकडे वर्ग करण्यांत आलें. तगाई कर्ज देतांना प्रथम प्रथम बऱ्याच अडचणी आल्या. तरीपण सर्वच अडचणींना या बँकेनें तोंड देऊन आतांपर्यंत १२,८४,७५० रुपये ८९३ विहिरी-करतां दिले असून १५,८८,४०० रुपये ६१३ लोकांना इंजिना-करतां कर्ज दिलेलें आहे. १९५९-६० सालअखेर रौप्य महोत्सवा-करितां ३,००० रुपयांची तरतूद करून या बँकेस ३४,३६६ रुपयांचा नफा होऊन बँकेच्या इतिहासांत उच्चांक गांठलेला आहे व ४% टक्के डिव्हिडंडहि जाहीर करण्यांत आलेला आहे. सुरवातीचीं १-२ वर्षें सोडल्यास बँकेचा ऑडिट वर्ग ' अ ' आहे.

" आतां तर आपल्या सरकारनें विहीर, इंजिन तगाई कर्जाचा व्यवहार या बँकांकडे दिला असून सहकारी खात्यातर्फे १-२ स्वतंत्र अधिकारी असणें अत्यंत निकडीचें व जरूरीचें आहे. म्हणजेच योग्य तें मार्गदर्शन होऊन या महत्त्वाच्या विभागाची नीटशी व्यवस्था लागेल. त्याचप्रमाणें बँकेचें ठरलेलें कर्जाचें धोरण वेळोवेळीं बदलल्याचें जिल्हा बँकांना आपल्या कार्यक्षेत्रामधील शेतकऱ्यांमध्यें संपादन केलेला विश्वास व पत घालवावी लागते. अशा प्रकारचे अनेक वेळां अनुभव आले आहेत. ग्रामीण भागांतील सावकारी अजिबात बंद झाली असून खरेदीपत्राशिवाय आणि पतीशिवाय कर्जच मिळत नाहीं. तांतडीनें जमीन सुधारणेची झाल्यास, विहीर नादुरुस्त झाल्यास, आकस्मिकपणें बैल मेल्यास अगर एखादें इंजिन फुटल्यास किंवा एखादें नवीन घेण्याचें झाल्यास या व अशा अनेक कामाकरितां प्रसंगोपात पतीवर कर्ज काढावें लागतें. सोसायटीचे अगर तगाईचे हप्ते वेळच्या वेळीं दिले असल्यास ते कर्जसुद्धां नवीन अर्जात दाखविण्यास कांहीं हरकत असूं नये, असें मला वाटतें. मुंबईच्या बँकेच्या ११३ नंबरच्या सर्क्यूलरचा फेरविचार व्हावा व मुंबई बँकेचें कर्जाचें धोरण त्या सर्क्यूलरप्रमाणें कायम असावें असें माझें मत आहे. "

---

### द. आफ्रिकेचें निशाण

द. आफ्रिका ब्रिटिश कॉमनवेल्थमधून बाहेर पडल्यावरहि, आपल्या निशाणावर ब्रिटिश युनियन जॅकचें चिन्ह कायम राख-णार आहे.

### साखरेवरील एक्साईज ड्यूटी भरण्यास कारखान्यांना सवलत

साखर कारखान्यांना साखरेचे मोठे साठे ठेवून शेतकऱ्यांना उसाचे पैसे देऊन टाकणें कठीण जात आहे; त्यांना पैसे उभार-ण्यास अडचण वाटत आहे. ह्यावर तात्कालिक उपाय म्हणून, कारखान्यांच्या बाहेर पडणाऱ्या साखरेवरील एक्साईज पट्टीपैकी २५% पर्यंत रक्कम भरण्यास तीन महिनेपर्यंत मुदत देण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ३० सप्टेंबर, १९६१ पूर्वी कारखान्या-बाहेर पडणाऱ्या साखरेपुरतीच ही सवलत अंमलांत राहील.

### पूर्व पाकिस्तानांत सोन्याची महर्गता

पश्चिम पाकिस्तानांत सोन्याचा भाव १४१ रु. तोळा असा आहे, तर पूर्व पाकिस्तानांत तो १६५ रु. तोळा आहे. पूर्व पाकिस्तानाची सोन्याची मासिक गरज १०,००० तोळ्यांची आहे, पण स्टेट बँक ऑफ पाकिस्तान फक्त २,००० तोळ्यांचीच सोय करते. पूर्व पाकिस्तानांतील " विशिष्ट जमातींचे " लोक सोन्याच्या स्वरूपांत आपले पैसे भारतांत पाठवतात, अशी पाकिस्तानी अर्थमंत्र्यांची तक्रार आहे.

---

### इंदूर येथें खेळांसाठी कायम आखाडा

इंदूरच्या कॉर्पोरेशननें खेळासाठी एक स्टेडिअम बांधण्याच्या कामास प्रारंभ केला आहे. आखाड्यासाठी ३२ एकरांची जागा ताब्यांत घेण्यांत आली आहे. तो बांधण्यासाठी २५ लाख रुपये खर्च येणार असून त्यांतील दोन लाख रुपये मध्यप्रदेश सरकारनें मदत म्हणून दिले आहेत. होळकर महाराज, कर्नल सी. के. नायडू, इत्यादींनीं ह्या कामीं पुढाकार घेतलेला आहे. आखाड्यांत २५,००० प्रेक्षकांची बसण्याची सोय करण्यांत येणार आहे. हॉकी, फुटबॉल, क्रिकेट, रेसकोर्स, सायकलच्या शर्यती, इत्यादी-साठीं सोयी आखाड्यांत करण्यांत येतील.

---

### सुटका झालेल्या कैद्यांचें वजन वाढलें

उत्तर प्रदेशाच्या तुरुंगखात्याचा १९५८ सालचा अहवाल राज्याच्या विधानसभेला सादर करण्यांत आला. त्यावरून असें दिसतें कीं तुरुंगांतील कैद्यांना तेथील वास्तव्य चांगलें मानवलें. कारण शिक्षा, भोगत असतांनाहि ह्या कैद्यांचें वजन वाढलेलें दिसून आलें. अहवालाच्या सालीं ६५,००० कैद्यांची तुरुंगांतून मुक्तता करण्यांत आली. त्यांपैकीं २७,००० कैद्यांचीं वजनें वाढलीं. ६७९ कैद्यांचीं वजनें १० पौंडांपेक्षांहि अधिक वाढली.

---

### भारी विद्युत् यंत्रसामग्रीचा कारखाना

भारी विद्युत् यंत्रसामग्री तयार करणारा भारतामधील दुसरा कारखाना केरळमध्यें काढण्यांत येणार आहे. जपानमधील हिटाची लि. व केरळ सरकार ह्यांच्यांत कारखाना काढण्यासंबंधीं एकमत झालेलें असून कराराचा मसुदा भारत सरकारच्या मंजुरीसाठी लवकरच पाठविण्यांत येणार आहे. कारखान्याचें अधिकृत भांड-वल २ कोटी रुपयांचें असेल व वसूल भांडवल १ कोटी रुपयांचें असेल. २५ टक्के भांडवल केरळ सरकार उभारणार असून २५ टक्के हिटाची कंपनी पुरविणार आहे. उरलेलें ५० टक्के भांडवल सार्वजनिक विक्रीच्या मार्गानें उभें करण्यांत यावयाचें आहे. हिटाची कंपनीचें बहुतेक भांडवल यंत्रसामग्रीच्या स्वरूपांत राहील.

# दि मिरज स्टेट बँक, लि.

हेड ऑफिस: मिरज

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९११

वसूल शेअर भांडवल : रुपये सहा लाख
खेळतें भांडवल : रुपये एक कोट
रिझर्व्ह फंड व इतर फंड : रुपये सात लाख

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर
(१) तीन वर्षे मुदत ठेवीकरितां व्याज दर ४ टक्के.
(२) पांच वर्षे मुदत ठेवीकरतां व्याज दर ४½ टक्के.

हेड ऑफिस मिरजमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची उत्कृष्ट व्यवस्था.

बँकेच्या शाखाः सांगली (गणपति पेठ), सांगली (मार्केटयार्ड), कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा व लक्ष्मेश्वर.

श्री. एन्. पी. कानिटकर, ॲड्व्होकेट, चेअरमन. | के. डी. शिराळकर, मॅनेजर.



# भोर स्टेट बँक लि.

(स्थापना १९४३)

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ९१,००० |

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. म. त्र्यं. शिगरे, अध्यक्ष | न. मू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष
श्री. गो. बा. देवी | श्री. बा. ग. धंदुके



नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

# दि बेळगांव बँक लिमिटेड

बेळगांव

(शेड्यूल्ड बँक)

स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्ये, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंगजचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येते.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

दि बेळगांव बँक लिमिटेड.

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर



स्थापना १९३६

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नासिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. हलकर्णी, ११. इचलकरंजी, १२. फलटण, १३. अकलूज.

३१ डिसेंबर, १९६०

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ५,०१,००० |
| ठेवी | रु. | २,१५०० ००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ४,५९,००,००० |

ठेवीवरील नवीन व आकर्षक व्याजाचे दर

१. चालू खातें ०-५० २. सेव्हिंग्ज बँक २-५०
३. स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट ३-००

मुदत ठेवी—१ वर्ष ३-०० २ वर्षे ३-२५
३ वर्षे ३-७५ ५ वर्षे ४-००

रुपये एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., *जनरल मॅनेजर.* | शं. ह. साठे, बी. ए., एलएल्. बी., *चेअरमन.*

**कोळशाच्या खाणींचें राष्ट्रीयीकरण नको**— हिंदमधील खाजगी मालकीच्या कोळशांच्या खाणींचें राष्ट्रीयीकरण करण्यांत यावें असा ठराव लोकसभेंत मांडण्यांत आला होता; परंतु सरकारनें तो फेटाळून लावला. कोळशाच्या खाणींचें राष्ट्रीयीकरण करण्यांत विरोधी तात्त्विक विचारांबरोबरच व्यावहारिक अडचणी आहेत असा खुलासा सरकारतर्फे करण्यांत आला.

**यौगिक उपचारांचें इस्पितळ**— लोणावळा येथें स्वामी कुवलयानंद ह्यांनीं चालविलेल्या कैवल्यधाम ह्या संस्थेतर्फे यौगिक उपचारपद्धतीचें एक इस्पितळ स्थापन करण्यांत आलें आहे. इस्पितळाच्या स्थापनेसाठी श्री. अमृतलालजी गुप्ता ह्या धनिकानें आपल्या आईच्या स्मृतीप्रीत्यर्थ १ लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्याशिवाय महाराष्ट्र सरकारनें २५,००० रुपये आणि मध्यवर्ती सरकारनें १३,००० रुपये मदतीदाखल दिले आहेत.

**कुटुंबनियोजनाला पाठिंबा**—कुटुंबनियोजनाच्या बाबतींतील लोकमताची चांचणी घेण्यासाठी त्रिवेंद्रम् शहराची पाहाणी करण्यांत आली असतां ७२ टक्के जोडप्यांनीं कुटुंबनियोजनाला पाठिंबा दिला. तथापि, कुटुंबनियोजनाच्या पद्धतीविषयीं पुरुषांपैकीं शेंकडा फक्त ८ टक्के लोकांना आणि स्त्रियांपैकीं फक्त २ टक्के स्त्रियांना विषयाबाबत पुरेशी माहिती असल्याचें दिसून आलें.

**छोट्या मोटारींचें उत्पादन**—पश्चिम जर्मनींतील व्होक्सवॅगन ह्या प्रकारच्या छोट्या मोटारगाड्या तयार करण्यासाठी सरकारशीं करण्यांत येत असलेल्या वाटाघाटी निष्फळ ठरल्या आहेत. आतां एका जपानी कंपनीशीं वाटाघाटी चालू आहेत. ह्या बाबतींत नेमण्यांत आलेल्या पांडे कमिटीच्या अहवालाला त्यामुळें विलंब लागत आहे.

**विशाखापट्टमचा बोट-बांधणीचा कारखाना**—विशाखापट्टम् येथील बोट-बांधणीच्या कारखान्याला १९५९-६० सालीं ६७,८७३ रुपये नफा झाला अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. ह्या पूर्वीच्या आर्थिक वर्षांत कारखान्याला ४,७६४ रुपये तोटा सहन करावा लागला होता. पोलादाच्या पुरवठ्याबाबत कारखान्याला कोठल्याहि अडचणींना तोंड द्यावें लागत नाहीं.

**केरळमधील विकास योजना**— केरळमधील पेरिआर नदीच्या खोऱ्याचा विकास करण्याच्या योजनेला १९५६ सालीं प्रारंभ करण्यांत आला. ह्या योजनेसाठी ३४८ लाख रुपये खर्च येईल. पेरिआर नदीवर धरण बांधून धरणांतील पाण्यानें ६०,००० एकर जमिनीला पाणीपुरवठा करण्यांत यावयाचा आहे. ह्या योजनेमुळें भाताच्या उत्पादनांत बरीच भर पडणार आहे.

**तागाच्या बाबतींत स्वयंपूर्णता**— तागाच्या गरजेबाबत स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीनें भारत सरकारनें एक योजना आखली आहे, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत ही स्वयंपूर्णता साध्य करावयाची आहे. ह्या कार्यक्रमांत ६५ लाख तागाच्या गांसड्यांचें उत्पादन करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे.

**कामगारांच्या आरोग्याची चिंता**—चीनमध्यें गेलीं दोन वर्षें अनावृष्टीमुळें दुष्काळ पडला. त्यामुळें कामगारांचा आहार निकस व अपुरा झाला. त्याचा परिणाम म्हणून त्यांचें आरोग्य खालावत चाललेलें आहे. चीनमधील वृत्तपत्रांत अलीकडे ह्या प्रश्नाची चर्चा होऊं लागलेली आहे. तरी पण कामगारांकडून कष्टाचीं कामें करवून घेण्यांत येत असतात; अपुऱ्या अन्नामुळें त्यांच्या कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होण्याचा धोका आहे.


दूरध्वनि क्रमांक :-१०३ श्रीरामपूर. तार :-छत्रपति राहुरी.

# दि राहुरी सहकारी साखर कारखाना लि.,

## श्री.शिवाजीनगर. ता. राहुरी. जिल्हा : अहमदनगर.

[स्थापना : १९५४ ] * * * * * * * [ सभासद संख्या १४८७

सहकारी चळवळीनें भारतीयांच्या जीवनांत आमूलाग्र बदल घडून येत आहे. सहकारी साखरकारखाना हें या चळवळीचें नेत्रदीपक यश दाखवीत आहेत. राहुरी सहकारी साखर कारखाना स्वकृतीनें या यशांत आपला वांटा मोठ्या मानानें मिळवीत आहे, आणि याचें सर्व श्रेय या साखर कारखान्याचे उत्पादक सभासद, अविश्रांत श्रम करणारा कामगारवर्ग आणि कुशल अधिकारी यांना आहे. आणि म्हणूनच निरपेक्षबुद्धीनें केलेल्या संचालकांच्या सेवेचें चीज होत आहे.

चालू हंगामांत दिनांक २३-४-६१ पर्यंत १,७९,९३१ मे. टन क्रशिंग होऊन पावणेतीन मण भरतीचीं १,०९,८०५ साखर पोतीं तयार झालीं असून साखरेचें उत्पादन जोरांत चालू आहे. सहकारी युगांत राहुरी सहकारी साखर कारखान्यानें केलेली प्रगति खालील उत्पादनाचे आंकड्यांवरून दिसून येईल.

कारखान्याचा तृतीय हंगाम यशस्वी रीतीनें पार पडला असून चतुर्थ हंगाम दिनांक १५ ऑक्टोबर १९६० पासून सुरू झाला आहे व उत्तम रीतीनें चालू आहे.

| हंगाम | एकूण गळीत (टन) | एकूण उत्पादन (पोतीं) |
|---|---|---|
| १९५७-५८ | १,२५,१९४ | १,२७,०४१ |
| १९५८-५९ | १,२३,१५८ | १,४६,३५४ |
| १९५९-६० | १,५६,१७१ | १,८६,५६४ |
| १९६०-६१ (अंदाजे) | १,९५,००० | २,२५,००० |

राहुरीच्या शुभ्र व दाणेदार साखरेस सर्वत्र चांगली मागणी आहे.

बी. बी. तनपुरे, चेअरमन.

**एंजिनिअर्सना शिक्षण देणारी संस्था—** मुंबईजवळ पवई येथे औद्योगिक कारखान्यांना लागणाऱ्या एंजिनिअर्सना शिक्षण देऊन तयार करण्यासाठी एक राष्ट्रीय संस्था स्थापन करण्याचा भारत सरकारचा विचार आहे. संस्था स्थापन करण्याच्या कामीं संयुक्त राष्ट्राच्या खास मदत निधीकडून व आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेकडून मदत घेण्यांत येणार आहे. त्याशिवाय व्यवस्थापकीय शिक्षण देणाऱ्या दोन संस्थाहि काढण्यांत येणार आहेत.

**टेलिप्रिंटरच्या कारखान्यांतील उत्पादन—** तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस भारताची टेलिप्रिंटर्सची मागणी देशांतील उत्पादनानेंच भागविली जाईल असा अंदाज आहे. मद्रास येथें सरकारच्या मालकीचा हिंदुस्थान टेलिप्रिंटर्स लि. हा कारखाना आहे, तो सर्व गरज भागवूं शकेल. ह्या वर्षी कारखाना १७० यंत्रें निर्माण करूं शकेल. नंतर उत्पादन वाढविण्यांत येऊन १९६३–६४ सालीं नियोजित उद्दिष्ट गांठण्यांत येईल.

**गहूं घेण्यासाठी कर्जाची मागणी—** चीनमधील दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्यासाठी चीनचें सरकार परदेशांतून धान्याची आयात करीत आहे. ऑस्ट्रेलिआ व कॅनडा ह्या देशाकडून २० लाख टन गहूं चीननें रोख किंमत देऊन खरेदी केला आहे. कॅनडाकडून आणखी २० लाख टन गहूं विकत घेण्यासाठी चीननें कॅनडाकडे २० कोटी डॉलर्सच्या कर्जाची मागणी केली आहे.

**चिरतारुण्य प्राप्तीचा संभव—** रशिआनें अंतराळी प्रवास करणाऱ्या यानामध्यें माणूस बसवून तें सोडलें व नंतर तें अंतरिक्षांतून पृथ्वीवर परतहि आणलें. ह्यासंबंधी बोलतांना एक रशिअन शास्त्रज्ञ म्हणाला कीं अंतराळच्या यानांत प्रवास करतांना माणसाचें वजन नाहींसें होतें. त्यामुळें त्याच्या शरीरव्यापारावरील ताण कमी होऊन माणूस अधिक तरणा होण्याचा संभव आहे. त्याचप्रमाणें रोगापासूनहि त्याची मुक्तता होण्याची शक्यता आहे.

**नाझी गुन्हेगाराची चवकशी—** हिटलरच्या हुकूमानें लाखों ज्यू लोकांना मृत्युमुखी पाठविणारा युद्ध गुन्हेगार ॲडॉल्फ आइश्कमन ह्याची चवकशी इस्राइलच्या सरकारनें चालविली आहे. गुन्हेगाराला गोळी घालून कोणी ठार करूं नये अगर त्यानें आत्महत्त्या करूं नये म्हणून कडक खबरदारी घेण्यांत येत आहे. चौकशीच्या वेळीं न्यायालयांत त्याला एका कांचेच्या खोलींत ठेवण्यांत येतें. खोली गोळ्यांना दाद न देणारी आहे.

**भारतामधील मालाचें प्रदर्शन—** मलायामध्यें भारतामधील मालाचें एक प्रदर्शन भरविण्यांत आलें आहे. प्रदर्शन दोन आठवडे चालूं राहणार आहे. प्रदर्शनांत भारतामधील ३०० कारखानदारांनीं भाग घेतला आहे. भारताच्या मालाचें मलायामध्यें भरविण्यांत आलेलें हें पहिलेंच प्रदर्शन असून त्यांत एंजिनिअरिंगचा माल, औषधें, तंबाखू, इत्यादि रोज खपाच्या वस्तू ठेवण्यांत आल्या आहेत.


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००

बचतीच्या आकर्षक योजना

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर २॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | „ ३। „ |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | „ ५ „ |

*मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९१८ ] गिरगांव, मुंबई ४. [ टेलि. : ७०१४

महाराष्ट्राची अग्रेसर सहकारी बँक

| | | | |
|---|---|---|---|
| भाग भांडवल : | ... | ... | रु. ८,७५,००० |
| रिझर्व्ह फंडस् : | ... | ... | रु. १०,०८,००० |
| ठेवी : | ... | ... | रु. १,४५,५७,००० |
| खेळतें भांडवल : | ... | ... | रु. १,७६,००,००० |

शाखा : फोर्ट, दादर, वरळी, वडाळा, माहीम, पुणें, बेळगांव.

*मिश्रांची शाखा :* सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.